# जपानी पुष्परचना - भाग १७




या रचनेत पुष्पपात्र म्हणजे काळ्या रंगाचे दागिने ठेवायचे बॉक्स वापरले आहे. केशरी रंगाचे लिलीयम, त्याच्या बरोबर रंगसंगती साधणारी पिवळ्या रंगाची शेवंती आणि दोन नाजूक अशी लांब देठ असलेली हिरवी पाने अश्या अगदी मोजक्या साहित्यातून रचना केली आहे. दोन झाडांच्या वाळलेल्या फांद्या त्यासोबत लावल्या आहेत. दोन फर्नची पाने पण रचनेला छान उठाव देत आहेत. इकेबाना रचनांचे हे वैशिष्ट्य आहे.... अगदी कमी फुले पाने वापरून कलात्मक दिसतील अशा रचना करता येतात.

एकटे लिलीयम जणूकाही आपले मनोगत व्यक्त करीत आहे. 'एकटा असलो तरी मजेत आहे. माझी छोटी भावंडे (म्हणजे लिलीयमच्या कळ्या) उद्या परवा उमलतील. जोडीला पिवळी शेवंती, हिरवी पाने....माझेच मित्र!! झाडावर नसलो, शेतात नसलो तरी इथेही मला मान आहे, छान कंपनी आहे.

माझे छान फोटो काढले आहेत. या वेगळ्या साजात मी कसा वाटतो? सगळी रंगसंगती छान जुळून आली आहे. वाळलेल्या फांदीची सोबत सुध्दा रचनेचा समतोल साधणारी आहे.'


**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो इकेबाना पुणे शाखा, इंडिया

asdssd@gmail.com

फोन नं 9881043456